दिनांक १४/०७/२०१७

गडचिरोली पोलीस ठाणे हद्दीतील बटुवार कॉम्प्लेक्स, बटुवार पेट्रोलपंप जवळ गडचिरोली येथे दिनांक ११/११/२०११ रोजी सुविधा फार्मींग ॲन्ड अलाईड प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीने आपले कार्यालय सुरु करुन कंपनीकरीता गुंतवणुकदार शोधण्यासाठी आकर्षक मोबदला देवून एजंट नेमले. नेमलेल्या एजंटने गडचिरोली जिल्हयातील विविध गावातील गावकऱ्यांना आरडी, फिक्स डिपॉझिटवर अंदाजे १२/- टक्के व्याज देण्याच्या हमीवर मोठया प्रमाणात गुंतवणुकदार बनवून त्यांचेकडून मोठया प्रमाणात रोख रक्कम गोळा केलेली आहे.

जानेवारी २०१७ मध्ये गडचिरोली येथील सुविधा फार्मींग ॲन्ड अलाईड प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीने आपले कार्यालय बंद केले आहे. या कंपनीने आणखी सुविधा लॅन्ड डेव्हलपर लि., क्रियेटीव्ह इंडिया मल्टीस्टेट. ॲग्रो पर्पज को.ऑ.सो.लि., सिआय हर्बल लि. अशा प्रकारच्या विविध कंपन्या स्थापन करुन लोकांकडून गुंतवणूक स्वीकारुन लोकांचे घेतलेले पैसे परत न देता गडचिरोली येथील कार्यालय बंद केलेले आहे

सुविधा कंपनीने त्यांचे कार्यालय बंद केल्याने गुंतवणूकदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथील स्थानिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी चालु आहे. तरी ज्या गुंतवणुकदार यांना तक्रार देणे आहे त्यांनी खालील नमुद कागदपत्रासह हजर रहावे.

१) गुंतवणुकदार यांनी त्यांचेकडील सुविधा फार्मींग ॲन्ड अलाईड प्रायव्हेट लिमीटेड या कंपनी मध्ये गुंतविलेल्या रकमेसंदर्भात कंपनीकडून देण्यात आलेले सर्टिफिकेट, पैसे भरल्याच्या पावत्या किंवा बुकच्या मुळ प्रती घेवून यावेत.

२) कंपनीकडून गुंतवणूक करण्यासाठी दिलेले जाहिरात पत्रक किंवा कंपनीकडून कंपनीचे संदर्भात माहिती देणारे कागदपत्र सोबत आणावेत.

३) कंपनीचे एजंट यांनी त्यांचेकडील गुंतवणुकदारांचे नावांची व गुंतवणुकीचे माहितीचा तक्ता भरुन सोबत आणावा.

४) गुंतवणुकदार, एजंट यांनी त्यांचेकडील कागदपत्रे एका स्वतंत्र फाईलमध्ये लावून आणावेत.

५) गडचिरोली तालुक्याचे बाहेरील गुंतवणुकदार यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय, स्थागुशा गडचिरोली येथे सकाळी १०.०० ते ०४.०० या वेळेत खाली दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करुन यावे जेणेकरुन त्यांना अर्ज चौकशी नंतर वेळेत घरी जाणे सोयीचे होईल.

**संपर्क क्रमांक :- ०७१३२-२२३१७४**